## “अपघाताचा बनाव करुन खुन लपविण्याचा आरोपीचा प्रयत्न फसला.”
## स्थानिक गुन्हे शाखेकडून २४ तासात सर्व आरोपी बीड जिल्ह्यातुन ताब्यात

दि.०२.०२.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक रात्रगस्तीवर असताना त्यांना पो स्टे वाशी हद्दीत घुलेचा मळा शिवारात सोलापूर बीड हायवेवर एक इसम मयत अवस्थेत पडला असल्याची माहिती प्राप्त झाली. तृयांनी तात्काळ घटनास्थळाला भेट दिली असता आजूबाजूची परिस्थिती पाहून पोलीसांना घातपात झाला असल्याचा संशय आला. यातील मयत मुस्तकीन जब्बार शेख रा. साळेगाव ता. केज जि. बिड ह.मु. मोहा ता. कळंब असल्याचे ओळख पटल्याने तात्काळ तृयाचे नातेवाईकांकडे चौकशी केली असता त्यांचेकडून मयताची अकबर नावाचे इसमाबरोबर काही दिवसापुर्वी भांडण झाले असल्याचे समजले. प्राप्त माहितीवरुन तात्काळ तपासाची सुत्रे हलविली असता संशयित म्हणून अकबर सरदार शेख, रा.पिंपनेर, ता.जि. बीड याचे नाव समोर आले. सदरबाबत पोस्टे वाशी येथे गुरनं ३९/२०२५ कलम १०३(१), ३(५) अनृवये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्री. संजय जाधव सो यांना सदरबाबत माहिती देवून त्यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक हे तात्काळ संशयित आरोपीचे शोधकामी रवाना झाले. मौजे पिंपळनेर, ता.जि. बीड येथे जावून पथकाने संशयित इसमाची माहिती काढून त्याला शिताफिने ताब्यात घेवून त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने त्याचा भाउ अमर शेख, वडील सरदार शेख आणि दाजी फारुख शेख सर्व रा. पिंपळनेर, ता. जि. बीड यांचे मदतीने यातील मयत याने त्यांचे बहिणीशी अनैतिक संबंध असल्याच्या कारणावरुन वाशी शिवारात नेवून मारुन टाकले असल्याचे सांगितले. त्यानंतर पथकाने तात्काळ नमुद ०४ आरोपी व तृयांनी गुन्ह्यात वापरलेले ०२ मोटार सायकल ताब्यात घेवून त्यांना पुढी कारवाईकामी पोस्टे वाशी येथे हजर केले आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय जाधव, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गौहर हसन यांच्या आदेशावरुन स्थागुशा, धाराशिव चे सपोनि- श्री. सुदर्शन कासार, सपोफौ-वलीउल्ला काझी, पोलीस हावलदार- शौकत पठाण, फहरान पठाण, जावेद काझी, चालक पोलीस अंमलदार- रत्नदिप डोंगरे, नितीन भोसले यांच्या पथकाने केली आहे.




**(खुनाच्या गुन्ह्यातील अटक आरोपीसह स्था.गु.शा. चे पथक.)**

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस